जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/१२/२०२३
## दि.०३/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ६१०/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८ वर्षे,रा.राजीव गांधीनगर,विमाननगर,पुणे |
| **आरोपीत** | अशोक लक्ष्मण आढाव,वय-३१ वर्षे,रा.राजीव गांधीनगर,विमाननगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१२/२०२३ रोजी रात्री ०१/०० ते ०१/४५ वा.चे दरम्यान इस्ट कोर्ट बिल्डिंगचे खाली विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया ईस्ट कोर्ट बिल्डिंग येथील हॉटेल बँकस्टेज येथे गेले असताना,यातील नमुद इसम अशोक आढाव याने रात्री ०१/०० वा. हॉटेल बँकस्टेज मध्ये येवुन,त्यांचेवर संशय घेवुन,त्यांना शिवीगाळ व मारहाण केली. त्यावेळी हॉटेलचे स्टाफने त्यास तेथुन हाकलुन दिल्यानंतर फिर्यादी हया हॉटेल मधुन निघुन ईस्टकोर्ट बिल्डींगचे समोर येवुन थांबले असताना,सदर इसमाने सदर ठिकाणी येवून फिर्यादी यांना परत शिवीगाळ व हाताने मारहाण करून,तुला सोडत नाही,खल्लासच करतो असे बोलुन,त्याचे जवळील धारदार हत्याराने फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,त्यांचे पोटावर व डाव्या हाताचे दंडाच्या खालचे बाजुस वार करून,फिर्यादी यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. कादीर देशमुख ८४२१०३१५७३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ९४९/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३६ वर्षे,रा.लोहगाव,वाघोली रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/११/२०२३ रोजी पुणे रेल्वे स्टेशन १८/०० वा.ते १९/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी रोहन अभिलाषा,लोहगाव,वाघोली रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पुणे रेल्वेन प्रवास करून,रेल्वेतुन उतरून रिक्षाने त्यांचे राहते घरी जाण्यासाठी प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने, फिर्यादी यांचे बॅगे मधील सोन्याचे दागिने ४,२२,०००/- रु किमतीचे काढुन चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, कैलास साळुंके ९९२११७६२३७ / ९०११३४३०१० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ७३९/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४२ वर्षे,रा.कोलवडी ,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१२/२०२३ रोजी सकाळी ११/२० ते १२/०० वा.चे दरम्यान पंधरा नंबर हडपसर येथुन हडपसर लोणीगांव मार्गे रामदरा-आर्या हॉटेल सिद्रामम‌ळा बस स्टॉप लोणी-काळभोर पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने हडपसर लोणीगांव मार्गे रामदरा-आर्या हॉटेल सिद्राम मळा बस स्टॉप लोणी काळभोर असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ४५०००/- रुपये रु किमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, धेंडे ९५१८५११२१ |

## दि.०४/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ८८३/२०२३,भादविक ३२४,३४,महा.पो.का.क. ३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५), क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | सुहास माने,वय ३० वर्षे,रा.शांतीसागर सोसायटी,सकाळनगर,पुणे |
| **आरोपीत** | १.योगेश अनंता गायकवाड,वय २४ वर्षे,रा.के.के.वस्ती,दत्तवाडी,पुणे (अटक) व त्याचे दोन साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१२/२०२३ रोजी रात्री २०/०० वा.राजकमल स्वीट मार्ट दुकानाचे समोर,जनवाडी, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बाबा हॉटेल,गोखलेनगर,पुणे येथुन हॉटेल मधुन पार्सल घेवुन सकाळनगर येथे घरी जात असताना,आ.क्र.१ व त्याचे इतर दोन साथीदार यांनी संगनमत करून,नमुद ठिकाणी राजकमल स्वीट मार्ट,अक्की मेन्स पार्लर व न्यु तृप्ती चिकन सेंटर या दुकानांची तोडफोड करुन तसेच लोखंडी हत्यार हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली. तसेच फिर्यादी यांचे खांदयाचे बाजुस लोखंडी हत्यार मारुन त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरी. संतोष कोळी ९०४९९८१३५० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**